# स्थापत्य पंढरी – विश्वकर्मा आश्रम
# शैक्षणिक पालकत्व उपक्रम

**दिनांक : __________**

प्रति,

**महोदय/महोदया,**

**विषय : महाराष्ट्रातील बांधकाम साईटवरील कामगारांच्या मुलांसाठी "स्थापत्य पंढरी मार्फत शैक्षणिक पालकत्व उपक्रम" – माहिती**

बांधकाम क्षेत्रात कार्यरत कारागीर व स्थलांतरित कामगारांच्या मुलांच्या शिक्षण, सुरक्षा आणि सर्वांगीण विकासासाठी CSRDF (Construction Sector Research & Development Foundation) मार्फत एक राष्ट्रीय पातळीवरील आदर्श उपक्रम राबविण्यात येत आहे.

महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये बांधकाम साईटवर अनेक मुलांना शाळा मिळत नाही, स्थलांतरामुळे शिक्षण खंडित होते, आणि ते जेथे वास्तव्य करतात तेथे त्यांच्या वाढीसाठी अनुकूल व सुरक्षित वातावरणाची कमतरता भासते.

या वास्तवाच्या पार्श्वभूमीवर CSRDF ने **"स्थापत्य पंढरी – शैक्षणिक पालकत्व उपक्रम"** सुरू केला आहे, ज्याद्वारे संपूर्ण महाराष्ट्रातील पात्र मुलांना संपूर्ण रहिवासी व सर्वांगीण शिक्षणाची सुविधा देण्यात येणार आहे.

---

## उपक्रमाची पात्रता

- महाराष्ट्रातील **कोणत्याही बांधकाम साईटवर कार्यरत** कारागीर/मजूर/वर्कर्सची मुले
- इयत्ता **१ ली ते १० वी** (SSC Board)
- शिफारस पत्रासह आलेले अर्ज
- CSRDF शैक्षणिक समितीमार्फत मुलाखतीद्वारे निवड

---

# स्थापत्य पंढरी – विश्वकर्मा आश्रम
# शैक्षणिक पालकत्व उपक्रम

## सर्वांगीण रहिवासी शिक्षण (१ ली ते १० वी)

या उपक्रमांतर्गत **विश्वकर्मा आश्रम, स्थापत्य पंढरी** येथे विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित, संस्कारयुक्त, शिस्तबद्ध आणि आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात.

### मुख्य शिक्षण घटक

### १) क्रीडा शिक्षण

- भारतीय पारंपरिक मर्दानी कला
- आधुनिक ऑलिम्पिक स्तरावरील प्रशिक्षण

### २) बालसंस्कार

- संत साहित्य, वेद, अध्यात्म
- वारकरी विचार
- भारतीय संस्कृती आणि मूल्ये

### ३) बहुभाषिक शिक्षण

- मराठी, हिंदी, इंग्लिश
- जर्मन आणि जपानी भाषा प्रशिक्षण

### ४) तंत्रज्ञान आधारित शिक्षण

- संगणक कौशल्य
- कोडींग
- रोबोटिक्स प्रयोगशाळा

### ५) NEP आधारित व्यावसायिक शिक्षण

- स्थापत्य क्षेत्रातील **बलुतेदार पद्धती**
- जीवनमान कौशल्ये
- प्रात्यक्षिक शिक्षण संस्कृती

---

# स्थापत्य पंढरी – विश्वकर्मा आश्रम
# शैक्षणिक पालकत्व उपक्रम

## विश्वकर्मा आश्रम – आमची मूल्ये

**सेवा, करुणा, सत्यनिष्ठा, सामूहिकता, संतपरंपरेचा आदर, शिस्त, सातत्य, साधेपणा, अध्यात्मिक मानवता, वैज्ञानिक दृष्टिकोन, व्यवहारिक प्रगल्भता**

हीच मूल्ये प्रत्येक विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्वात रुजविणे हा आमचा मुख्य उद्देश आहे.

---

## उपलब्ध प्रस्तावित सुविधा

- निवास
- भोजनगृह
- खेळाचे मैदान
- अभ्यासिका
- ग्रंथालय
- ध्यान व योग केंद्र
- विज्ञान प्रयोगशाळा
- संगणक कक्ष
- रोबोटिक केंद्र
- आरोग्य तपासणी व्यवस्था
- निगा, शिस्त आणि संस्कार कार्यक्रम

---

## प्रवेश माहिती

- **फॉर्म भरण्याची अंतिम तारीख : ३१ जानेवारी २०२५**
- **एकूण प्रवेश क्षमता : १०० विद्यार्थी**
- संपूर्ण महाराष्ट्रातून अर्ज स्वीकारले जातील.

---

# स्थापत्य पंढरी – विश्वकर्मा आश्रम
# शैक्षणिक पालकत्व उपक्रम

## उपक्रमाचे ठिकाण:

बांधकाम क्षेत्र विकास व संशोधन संस्था संचालित,
विश्वकर्मा आश्रम, स्थापत्य पंढरी, कळंबवाडी (आ), पोस्ट: काटेगाव,
बार्शी – भूम रोड, तालुका: बार्शी, जिल्हा सोलापूर
महाराष्ट्र – 413409

---

आपली संस्था बांधकाम क्षेत्रात महत्त्वाचे योगदान देत आहे.
आपल्या संस्थेने या उपक्रमामध्ये सहकार्य केल्यास अनेक कामगारांच्या मुलांचे जीवन सुरक्षित, सुशिक्षित आणि उज्ज्वल होऊ शकते.

बांधकाम क्षेत्र आज देश उभं करतंय—आता त्याच क्षेत्रातील मुलांचं भवितव्य उभारण्याची ही सामूहिक जबाबदारी आहे.

अधिक माहितीसाठी:
Pravin Mundhe - 91120 78539
csrdfoundation@gmail.com
www.csrdf.in

आपला,

**CSRDF – स्थापत्य पंढरी**